प्रेस नोट

दिनांक: ०४/१०/२०२३

**निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,विभागीय भरारी पथक,पुणे विभाग,पुणे या कार्यालयाची गावठी हातभटटी दारु विरोधात मोठी कारवाई.**

---

मा.विभागीय उप आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग, पुणे श्री.मोहन वर्दे सो यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,विभागीय भरारी पथक,पुणे विभाग,पुणे या कार्यालयाने गांधी सप्ताहामध्ये मोहिम आखून दिनांक ०३/१०/२०२३ रोजी वाघोली, आंबळे व राजेवाडी या ठिकाणी दारुबंदी गुन्हयाअंतर्गत छापे मारुन ३ वारस व २ बेवारस असे एकुण ५ गुन्हयांची नोंद करुन सदर गुन्हयामध्ये ४९० लिटर गावठी हातभटटी दारु, ६००० लिटर रसायन,देशी दारु ९.३६ ब. लि., १ महिंद्रा कंपनीचे चारचाकी पिकअप वाहन, एक होंडा कंपनीची अॅक्टीव्हा व एक हिरो कंपनीची स्ट्रीम अशी २ दुचाकी वाहने तसेच गावठी हातभटटी दारु निर्मीतीचे साहीत्य असा एकुण अंदाजे किंमत रुपये १२,५७,६००/- किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असून सदर गुन्हयांतील आरोपी फरार असून त्यांना अटक करण्याची तजवीज करण्यात आलेली आहे. तसेच धनकवडी, पुणे येथे गावठी हातभटटी दारुची वाहतुक होणार आहे असे कळालेवरुन या पथकाने दिनांक ०४/१०/२०२३ रोजी त्या ठिकाणी पहाटे ०२.०० वा. सापळा रचला असता तेथे गावठी हातभटटी दारुने भरलेले ३५ लिटर क्षमतेचे ३२ प्लास्टीक कॅन ( ११२०लिटर ), गावठी हातभटटी दारुच्या वासाचे ३५ लिटर क्षमतेचे ३४ रिकामे कॅन तसेच १ टाटा कंपनीचा ACE मेगा चारचाकी टेंम्पो व होंडा अॅक्टीव्हा कंपनीची २ दुचाकी वाहने असा एकुण अंदाजे रुपये ४,८७,६००/- किंमतीचा मुददेमाल जप्त करुन सदर गुन्हयामध्ये एका आरोपीस अटक करण्यात आलेली असून सदर दोन्ही कारवाईमध्ये एकुण २ चारचाकी वाहने व ४ दुचाकी वाहने तसेच ६००० लिटर रसायन, १६१० लिटर तयार गावठी हातभटटी दारु व इतर साहीत्य असा एकुण अं.कि.रु. १७,४५,२००/- किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर कारवाईमध्ये दुय्यम निरीक्षक सर्वश्री.ए.बी.पाटील,ए.सी.फडतरे,जवान सर्वश्री.एस.एस.पोंधे, पी.टी.कदम,ए.आर.थोरात, ए.झेड.कांबळे,ए.एन.शेख,बी.एस.नेमाडे तसेच जवान नि वाहनचालक श्री. अमोल दळवी यांनी सहभाग घेतला असून सदर गुन्हयांचा पुढील तपास निरीक्षक श्री. नंदकुमार शा. जाधव हे करीत आहेत.

(नंदकुमार शा. जाधव)
निरीक्षक
राज्य उत्पादन शुल्क
विभागीय भरारी पथक, पुणे विभाग, पुणे